॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246

OFFICE OF THE REGISTRAR

website: srtmun.ac.in
Email: registrar@srtmun.ac.in

जा.क्र.: आस्था/०२/२०२५–२६/७८ दि. ०८ जुलै, २०२५

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ

**विषय:** 'मराठवाड्यातील सामाजिक–आर्थिक विकास, समस्या आणि उपायोजना' या विषयावरील कार्यशाळेसाठी अर्थशास्त्र विषयाच्या शिक्षकांना उपस्थित राहण्यासाठी कळविणे तथा कार्यरजा मंजूर करणे बाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठातील डॉ.शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राकडून दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात 'मराठवाड्यातील सामाजिक–आर्थिक विकास, समस्या आणि उपायोजना' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांना सदरील कार्यशाळेसाठी उपस्थित राहणेबाबत आपल्या स्तरावरून सूचना द्यावी व कार्यशाळेसाठी उपस्थित राहणेसाठी त्यांना कार्यरजा मंजूर करावी. ही विनंती.

(प्रा. डॉ. ज्ञानेश्वर दा. पवार)
प्र. कुलसचिव

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**सोबत:** संदर्भीय कार्यशाळेचे कार्यशाळेचे माहितीपत्रक

प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:

१. समन्वयक, डॉ.शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ
२. शैक्षणिक नियोजन व विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहितीस्तव:

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

Shot on OnePlus
By Dr.ASHOKTI 2025.07.11 12:29





# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

## डॉ.शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र

## एक दिवसीय कार्यशाळा

### मराठवाड्यातील सामाजिक–आर्थिक विकास : समस्या आणि उपाययोजना

**सोमवार, दिनांक १४ जुलै २०२५**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे मराठवाड्यातील गोदावरी नदीच्या काठी वसलेल्या नांदेड येथे स्थित आहे. दिनांक १७ सप्टेंबर १९९४ रोजी विद्यापीठाची स्थापना थोर स्वातंत्र्य सेनानी, कर्मयोगी संन्यासी आणि शिक्षण तज्ञ पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नावे करण्यात आली. उच्च शिक्षणाद्वारे मराठवाड्याच्या या भागास आर्थिक आणि सामाजिक विकासास मदत व्हावी, येथील तरुणांना देशातच नव्हे तर जगाच्या पाठीवर योग्य संधी मिळावी या हेतूने स्थापन झालेल्या विद्यापीठाची रौप्य महोत्सवोत्तर वाटचाल सुरु आहे. एकूण सव्वा पाचशे एकर परिसरात विस्तारलेल्या विद्यापीठात प्रशासकीय इमारतीसह १४ शैक्षणिक संकुले आहेत. विद्यापीठाचे लातूर आणि परभणी येथे उपकेंद्र असून किनवट येथे कै. उत्तमराव राठोड आदिवासी संशोधन व अभ्यास केंद्र आणि हिंगोली येथे न्यू मॉडेल डिग्री कॉलेज आहे. शिक्षण, संशोधन, क्रीडा आणि मुलभूत सुविधांचा विकास या बाबतीत विद्यापीठाने नेत्रदीपक कामगिरी केली आहे.

**डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र :** दिनांक ७ जून २०२२ रोजी डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राची स्थापना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि जलशंकर म्हणून ओळख असणारे मा. डॉ शंकरराव चव्हाण यांच्या जीवन आणि कार्याचा अभ्यास व्हावा आणि त्यानिमित्ताने

12:33 PM

त्यांचे विचार आणि साहित्य जनसामान्यांपर्यंत पोहोचावे या दृष्टीने हे अध्यासन अस्तित्वात आले आहे. परिषदा चर्चासत्रे, व्याख्यानमाला आयोजित करणे, विचारवंतांच्या विचारांचा विकित्सक अभ्यास करणे, संशोधन व कृतीप्रवण अभ्यासास चालना देणे, अध्यासनाच्या संबंधित कार्यातून नामांकित तज्ञ अभ्यासक आणि विद्यापीठातील संशोधन केंद्रे यामध्ये संबंध प्रस्थापित करणे या उद्दिष्टांसह डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासनाची वाटचाल सुरु आहे. डॉ. अभय देशपांडे, डॉ. सुरेश सावंत यांच्यासारख्या अभ्यासकांची व्याख्याने अध्यासानाने आयोजित केली आहेत तसेच विद्यापीठ परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यासाठी निबंध स्पर्धेसारख्या उपक्रमांचेही आयोजन केलेले आहे. अध्यासनाचा प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रम लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण हे केवळ एक नामवंत राजकारणी नव्हते तर तत्वनिष्ठ नेतृत्व, प्रगल्भविचारधारा आणि दूरदृष्टीचा मिलाफ असणारे एक प्रभावी व्यक्तिमत्व होते. देश पातळीवर महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या ना. शंकरराव चव्हाण यांचा महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी आणि विशेषतः जलसंधारण या क्षेत्रातील विकासात मोलाचा वाटा आहे म्हणूनच त्यांना आधुनिक भगीरथ आणि महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक असे संबोधिले जाते. यामुळेच डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या नावे स्थापन करण्यात आलेल्या या अध्यासनाकडून डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्ताने ''मराठवाड्यातील सामाजिक व आर्थिक विकासः समस्या आणि उपाय योजना या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

**कार्यशाळे विषयी माहिती :**

मराठवाडा हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक आणि लोकसंख्या दृष्टिकोनातून एक महत्त्वाचा भूभाग असून तो सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या अनेक आव्हानांना सामोरा जात आहे. अल्प दरडोई उत्पन्न, निम्न मानव विकास निर्देशांक, पाण्याची तीव्र टंचाई, शेतीची कमी उत्पादकता, औद्योगिक मागासलेपणा, बेरोजगारी आणि अपुऱ्या शिक्षण व आरोग्य सुविधा यांसारख्या प्रमुख समस्यांमुळे हा प्रदेश विकासाच्या प्रक्रियेत काहीसा मागे पडला आहे. याचा थेट परिणाम म्हणून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर आणि गरिबी मराठवाड्याला आजही यासून आहे. या महत्वपूर्ण विषयावर चर्चा घडवून या कार्यशाळेत तज्ञ साधन व्यक्ती मराठवाड्यातील मूळ समस्यांवर आणि त्याच्या कारणांवर प्रकाश टाकतील तसेच गटचर्चा आणि विचारमंथन केले जाईल.

या कार्यशाळेचा मुख्य उद्देश स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील मराठवाड्याच्या नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर या चार जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक गरजांवर आधारित आणि त्वरित अंमलबजावणी करता येतील अशा व्यवहार्य उपायांचा एक धोरण दस्तऐवज तयार करणे हा आहे. या विचारमंथनातून मराठवाड्याला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी एक नवी दिशा मिळेल अशी अपेक्षा आहे. प्रस्तुत कार्यशाळेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करणाऱ्या अर्थशास्त्र विषयाच्या सर्व प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.

✻ ✻ ✻

## कार्यशाळेची उद्दिष्टे :

१) विद्यापीठ कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांचा आर्थिक व सामाजिक सद्यस्थितीचा आढावा घेणे.

२) विद्यापीठ कार्यक्षेत्रातील जिल्हयांच्या विकासाची बलस्थाने अभ्यासणे.

३) विद्यापीठ कार्यक्षेत्रातील जिल्हानिहाय विकासातील अडथळ्यांचा अभ्यास करणे आणि कारणांचा आढावा घेणे.

४) विद्यापीठ कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांच्या विकासासाठी पूरक शिफारसी सुचवणे.

५) मराठवाड्यातील सामाजिक-आर्थिक विकासः समस्या व उपायोजना या विषयाचा धोरण दस्तऐवज शासनास सादर करणे.

## ✻ कार्यशाळेचे स्वरूप ✻

सोमवार, दिनांक : १४ जुलै २०२५ वेळ : सकाळी १०.३० ते ५.३०

स्थळ : अधिसभा सभागृह, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

✻ निमंत्रित वक्ते ✻

**डॉ. नरेश बोडखे**

प्राध्यापक, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे.

**श्री. प्रमोद सडोलीकर**

समन्वयक, सायो इम्पेरिकल रिसर्च एजन्सी एलएलपी, पुणे

## • नोंदणी •

सकाळी ९.०० ते १०.००

**अधिसभा सभागृह**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## संयोजन समिती

**डॉ योगिनी सातारकर**
समन्वयक, डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र
तथा समिती सचिव
मो.: ९८८१७१७०२७

**डॉ. ज्ञानेश्वर पवार**
प्र.कुलसचिव
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,
नांदेड

**डॉ अशोक टिपरसे**
समिती अध्यक्ष
मो. ९४२२५८०१२९

**डॉ. प्रमोद लोणारकर**
समिती सदस्य
मो. ७७४१०८३३७७

**डॉ. शालिनी कदम**
समिती सदस्य
मो. ८६९८९६३२२३

**डॉ. नंदकुमार बोधगिरे**
समिती सदस्य
मो. ९९६०६०६५९९

**डॉ. अजय मुठ्ठे**
समिती सदस्य
मो.९४२१३५९५४२

**डॉ. नीलकंठ पाटील**
समिती सदस्य
मो. ९८३४३२२९५४

---

ही कार्यशाळा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांसाठी आयोजित केलेली असून निःशुल्क आहे.